# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

**फोन नं.**(०२०) २६०५०६४१ **ई-मेल आयडी** :- sceapune@gmail.com


जा.क्र.रासनिप्रा/कक्ष-११/ निवडणूक/पदाधिकारी निवड/कार्यपध्दती/ 1457 /२०२०. दिनांक:- 19 /०३/२०२०.

19 MAR 2020

**वाचाले** :- १. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब (१).

२. महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणुक) नियम २०१४ चे नियम ३(पाच) व नियम ८० मधील तरतूद.

३. या प्राधिकरणाकडील परिपत्रक जा.क्र. ९७४५/सन २०१५, दिनांक ३०.१२.२०१५.

ज्या अर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब (१) मधील तरतुदीनुसार संचालकांमधून उपविधीत नमुद संस्थेच्या पदाधिका-यांची निवड करण्याचे अधिकार राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणास प्राप्त आहेत.

ज्या अर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणुक) नियम २०१४ चे नियम ७७ मधील तरतुदीनुसार पदाधिकारी निवडीकरीता बोलविण्यात येणा-या सभेकरीता अध्यासी अधिकारी नेमणूकीचे अधिकार प्राधिकरणास प्राप्त आहेत.

ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम ८० मधील तरतुदीनुसार निवडणुकीची गुप्तता राखणे हे निवडणुक प्रयोजनार्थ नेमलेल्या अधिकारी / कर्मचा-याचे कर्तव्य/ जबाबदारी आहे.

ज्याअर्थी, प्राधिकरणाने संदर्भ क्रमांक ३ च्या आदेशानुसार नियम ८० मधील तरतुदीचे निवडणूकीच्या प्रत्येक टप्प्यावर म्हणजेच संचालक मंडळ निवडणूक व पदाधिकारी निवडणूक या दोन्ही टप्प्यांवर गांभीर्य पूर्वक अनुपालन करण्याचे आदेश दिलेले आहेत.

ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम ३ (पाच) मधील तरतुदीनुसार निवडणूका सुरळीपणे व मुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी अधिनियम व नियमातील तरतुदींशी सुसंगत आदेश/ निर्देश देण्याचे अधिकार राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणास प्राप्त आहेत.

त्याअर्थी, प्राधिकरण पदाधिकारी निवडी संदर्भात खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## :: आ दे श ::

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब व महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम ३ (पाच) मधील तरतुदीनुसार प्राप्त अधिकारांचा वापर करून प्राधिकरण संस्थेच्या पदाधिकारी निवडीसंदर्भात खालील प्रमाणे कार्यपदधती निश्चित करीत आहे.

१. प्राधिकरणाने नियुक्त केलेल्या अध्यासी अधिकारी यांनी पदाधिकारी निवडीकरीता उपविधीतील तरतुदीप्रमाणे फक्त **पदाधिकारी निवडीच्या** विषयाचा समावेश करूनच विषयपत्रिका निर्गमीत करून संचालक मंडळ सभेचे आयोजन करावे.

२. प्राधिकृत अधिकारी यांनी सभेची विषयपत्रिका सर्व समिती सदस्यांना पोहोच झाली असल्याची खात्री करावी.

३. पदाधिकारी निवडीकरीता आयोजीत सभेचे कामकाज सुरू करण्यापूर्वी प्राधीकृत अधिकारी यांचे सहाय्यक व संबंधीत सहकारी संस्थेचे संचालक मंडळ सभेच्या कामकाजाशी संबंधीत व्यक्ती आणि संचालक यांचेव्यतिरिक्त अन्य व्यक्तींना प्रवेश देऊ नये.

४. पदाधिकारी निवडीकरीता आयोजीत सभेचे आयोजन करताना पूर्व इतिहास, न्यायप्रविष्ठ प्रकरणे, गटातटाचे राजकारण इ. बाबी विचारात घेऊन सदरची सभा कायदा व सुव्यवस्था पालन करून पूर्ण होण्याकरीता आवश्यकतेप्रमाणे पोलीस बंदोबस्ताचे / व्हिडीओ शुटींगचे नियोजन करावे.

५. प्राधिकृत अधिकारी यांनी उपविधीत नमुद गणपुर्ती झाल्यानंतर उपस्थित संचालकांच्या उपस्थितीची स्वाक्षरी घेऊनच संचालक मंडळाच्या पदाधिकारी निवडीकरीता आयोजीत सभेचे कामकाज सुरू करावे.

६. संचालक मंडळाच्या पदाधिकारी निवडीकरीता आयोजीत सभेचे कामकाज सुरू करण्यापूर्वी अध्यासी अधिकारी यांनी सदर सभेचे इतिवृत्त लिहीण्याकरीता संबंधीत संस्थेच्या संचालक मंडळाच्या बैठकीचे इतिवृत्तांत नोंदवही ताब्यात घ्यावी.

७. पदाधिकारी निवडणूक गुप्त मतदान पध्दतीने पुर्ण करावी.

८. संचालक मंडळाच्या सभेच्या विषयपत्रिकेत निवडणूक कार्यक्रमाचा समावेश करावा.

९. निवडणूक कार्यक्रमात नामनिर्देशन पत्र वाटप व स्वीकृती, नामनिर्देशन पत्राची छाननी, वैध नामनिर्देशनपत्राची यादी प्रसिध्दी, नामनिर्देशन पत्र माघार, अंतीम उमेदवारांची यादी जाहिर करणे, मतदान, मतमोजणी व निकाल घोषित करणे या बाबींचा प्रामुख्याने समावेश करावा.

१०. अध्यासी अधिकारी यांनी नामनिर्देशन पत्राच्या छाननीवेळी दाखल नामनिर्देशन पत्राच्या आक्षेपांची संक्षिप्त चौकशी करुन निर्णय पारीत करावा.

११. अध्यासी अधिकारी यांनी जेवढी पदे निवडून दयावयाची आहेत तेवढे नामनिर्देशन पत्र प्राप्त झालेली असल्यास सदर व्यक्ती छाननीअंती बिनविरोध निवडून आल्याचे जाहिर करावे. मात्र जेवढी पदे निवडून दयावयाची आहेत त्या संख्येपेक्षा जास्त नामनिर्देशन पत्र प्राप्त झाल्यास अध्यासी अधिकारी यांनी गुप्त मतदानाचे नियोजन करावे व उपस्थित संचालकांना मतपत्रिका देण्याची व्यवस्था करावी.

१२. अध्यासी अधिकारी यांनी मतमोजणी नंतर निकाल जाहिर करावा.

१३. संचालक मंडळाच्या सभेचे कामकाजाचे इतिवृतांत तयार करुन इतिवृतांत प्रत जिल्हा/ तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांच्याकडे सादर करावी.

१४. उपरोक्त आदेश नवनिर्वाचीत समिती सदस्यांमधुन पदाधिकारी निवडीकरीता तसेच नैमित्तीकपणे रिक्त झालेले पदाधिकारी पद निवडीकरीता लागु राहतील.

१५. उपरोक्त आदेशाचे काटेकोटरपणे अंमलबजावणी करण्याची जबाबदारी जिल्हा/तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांची राहील.

**मा. आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या मान्यतेने.**

१७/०३/२०२०

**(यशवंत गिरी)**
सचिव,
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**प्रत,**

१. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व)

२. तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व)

**या प्राधिकरणाकडील आदेश जा.क्र. /सन २०२० सोबत जोडलेले परिशिष्ट १**

**......... सहकारी संस्था मर्या.......,**

**ता. ..........., जि. ...........**

---

जा.क्र. दि. :-

**नोटीस मसूदा**

................सहकारी संस्था मर्या.............ता....., जि...... या सहकारी संस्थेच्या सर्व संचालकांना सूचित करण्यात येते की, आपल्या सहकारी संस्थेच्या नोंदणीकृत उपविधीतील तरतुदीनुसार चेअरमन / व्हाईस चेअरमन / खजिनदार या पदाच्या निवडीकरीता अध्यासी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली दि. / /२०२० रोजी सकाळी ११.०० वाजता --------------- या ठिकाणी संचालक मंडळ सभेचे आयोजन करण्यात आलेले आहे, सर्व संचालकांनी संचालक मंडळाच्या सभेस हजर राहण्याबाबत अवाहन करण्यात येत आहे. सभेत संचालकांमधून निवडावयाच्या पदाधिका-यांच्या निवडीसाठी खालीलप्रमाणे निवडणुक कार्यक्रमानुसार कामकाज करण्यात येणार आहे.

**निवडणुक कार्यक्रम**

| अ.क्र. | तपशील | वेळ |
|---|---|---|
| १ | नामनिर्देशन पत्र वाटप व स्वीकृती | सकाळी ११.०० ते सकाळी ११.३० |
| २ | नामनिर्देशन पत्र छाननी | सकाळी ११.३० ते दुपारी १२.०० |
| ३ | वैध नामनिर्देशन पत्राची यादी प्रसिध्दी | दुपारी १२.०० |
| ४ | नामनिर्देशन पत्र माघार | दुपारी १२.०० ते दुपारी १२.३० |
| ५ | अंतीम उमेदवाराची यादी जाहिर करणे. | दुपारी १२.३० |
| ६ | मतदान प्रक्रिया | दुपारी १२.३० ते दुपारी १.३० |
| ७ | मतमोजणी प्रक्रिया | दुपारी १.३० ते दुपारी २.०० |
| ८ | निवडून आलेल्या पदाधिका-यांबाबत निकाल घोषीत करणे. | दुपारी २.०० |

**टिप :- निवडणूक कार्यक्रमातील वेळेत फेरबदल करण्याचे अधिकार अध्यासी अधिकारी यांचे राहतील. तथापि, निवडणूकीच्या प्रत्येक टप्प्याकरीता १५ ते ३० मिनिटांचा कालावधी देणे अध्यासी अधिकारी यांचेवर बंधनकारक राहिल.**

(मा. अध्यासी अधिकारी
यांचे मान्यतेने )

दिनांक :- स्वाक्षरी

ठिकाण :- सचिव/मुख्य कार्यकारी अधिकारी

**प्रत,**

१. श्री ............................................... संचालक
२.श्री.................................................संचालक
३.
४.
५.
६.
७.

**प्रत माहितीस्तव : -**

जिल्हा/ तालुका/प्रभाग सहकारी निवडणुक अधिकारी.

## या प्राधिकरणाकडील आदेश सोबत जोडलेले परिशिष्ट - २

### इतिवृत्तांत / अहवाल मसूदा

आज दिनांक / /२०२० रोजी सकाळी ११.०० वाजता ..... या ठिकाणी ......... सहकारी संस्था मर्या., ....... ता. ...... जि...... या सहकारी संस्थेच्या संचालकांमधुन चेअरमन/व्हा.चेअरमन/खजिनदार पदांच्या निवडीकरीता संचालक मंडळ सभेचे आयोजन केले असता खालील संचालक सभेस हजर राहीले.

१.

२.

३.

उपरोक्त संचालकांच्या उपस्थितीत निवडणुक कार्यक्रमानुसार संचालक मंडळाच्या सभेचे काजकाज सुरू करण्यात आले.

**विषय क्रमांक.०१ :- चेअरमन पदावर एका संचालकाची निवड करणे.**

ठराव क्रमांक.०१ :- चेअरमन पदाकरीता श्री............................. व श्री..................यांनी नामनिर्देशनपत्र सादर **केले**. श्री............... यांचे **नाव** श्री....................... यांनी सुचवले असून श्री......... यांनी अनुमोदन केलेले आहे. तसेच श्री............... यांचे **नाव** श्री....................... यांनी सुचवले असून श्री......... यांनी अनुमोदन केलेले आहे. चेअरमन पदाकरीता --- नामनिर्देशन पत्र सादर झाल्यामुळे मतदान घेण्यात आले. श्री....................व श्री. -------------- यांना अनुक्रमे ..... व ...... मते पडली आहेत. निकालानुसार श्री..................... यांची चेअरमन पदावर निवड करण्यात आली.

**विषय क्रमांक ०२ :- व्हाईस चेअरमन पदावर एका संचालकाची निवड करणे.**

ठराव क्रमांक ०२ :- व्हाईस चेअरमन पदाकरीता श्री............................. व श्री..................यांनी नामनिर्देशनपत्र सादर **केले**. श्री............... यांचे **नाव** श्री....................... यांनी सुचवले असून श्री......... यांनी अनुमोदन केलेले आहे. तसेच श्री............... यांचे **नाव** श्री....................... यांनी सुचवले असून श्री......... यांनी अनुमोदन केलेले आहे. व्हाईस चेअरमन पदाकरीता --- नामनिर्देशन पत्र सादर झाल्यामुळे मतदान घेण्यात आले. श्री....................व श्री. -------------- यांना अनुक्रमे ..... व ...... मते पडली आहेत. निकालानुसार श्री..................... यांची व्हाईस चेअरमन पदावर निवड करण्यात आली.

**विषय क्रमांक.०३ :-खजिनदार पदावर एका संचालकाची निवड करणे.**

ठराव क्रमांक.०३ :- खजिनदार पदाकरीता श्री............................. व श्री..................यांनी नामनिर्देशनपत्र सादर **केले**. श्री............... यांचे **नाव** श्री....................... यांनी सुचवले असून श्री......... यांनी अनुमोदन केलेले आहे. तसेच श्री............... यांचे **नाव** श्री....................... यांनी सुचवले असून श्री......... यांनी अनुमोदन केलेले आहे. खजिनदार पदाकरीता दोन नामनिर्देशन पत्र सादर झाल्यामुळे मतदान घेण्यात आले. श्री....................व श्री. -------------- यांना अनुक्रमे ..... व ...... मते पडली आहेत. निकालानुसार श्री..................... यांची खजिनदार पदावर निवड करण्यात आली.

उपस्थित संचालकांनी पदाधिकारी निवडीकरीता सहकार्य केल्यामुळे अध्यासी अधिकारी यांनी उपस्थित संचालकांचे आभार व्यक्त करून सभा संपल्याचे जाहीर केले.

दिनांक -

**अध्यासी अधिका-याचे नाव व सही**